


# मिरज-लातूर जलदूत रेल्वे - एक भगीरथ प्रयत्न

शेखर गायकवाड भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, सांगली

## प्रस्तावना

गेले दोन वर्षे दुष्काळाच्या झळा महाराष्ट्रातील लोक सहन करत असताना किमान पिण्याचे पाणीदेखील उपलब्ध करणे जिकिरीचे ठरत आहे . अशातच लातूरसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी पाणीबाणी उद्‌भवली.

लातूरची पाणीबाणी लक्षात घेऊन मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांनी प्रसंगी लातूरला रेल्वेने पाणी दिले जाईल, याची ग्वाही दिली होती. या पार्श्वभूमिवर लातूरला उजनी धरणातून पंढरपूर येथून पाणी देण्याचा विचार प्रारंभी करण्यात आला. मात्र, काही अडचणींमुळे ऐनवेळी मिरजहून पाणी देण्याचा पर्याय पुढे आला.

जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि रेल्वे प्रशासनाच्या टीमवर्कने भगीरथ प्रयत्नांनी हा पर्याय सार्थ ठरवत मदतकार्याचा एक नवा अध्याय लिहिला. या ऐतिहासिक प्रयोगाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. रेल्वे व्हॅगन्समधून खऱ्या अर्थाने लातूरकरांना ‘जीवन’ मिळाले आणि जगण्याची आशाही... या सर्व प्रयोगासाठी केलेले कष्ट सार्थकी लागले , याचे मला व्यक्तिशः समाधान आहे. प्रशासकीय कारकिर्दीत माझ्या हातून घडलेल्या काही चांगल्या गोष्टींमधील ही अनोखी गोष्ट आहे.

प्रशासनात आपत्तीला सुसंधी मानून काम केल्यास आणि त्याला सर्वांची साथ लाभल्यास अशक्यप्राय गोष्टीदेखील करणे शक्य होते . हे शिवधनुष्य आम्ही पेललं ... अशा प्रसंगामध्ये आलेले अनुभव इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांना उपयोगी ठरावे , या हेतूने 15 दिवसांच्या कालखंडात केलेल्या या ऐतिहासिक प्रयोगाची माहिती सांगणारी ही छोटीशी सचित्र पुस्तिका करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

**सांगली** **(शेखर गायकवाड)**

भा.प्र.से

**दि. 1 मे 2016** **जिल्हाधिकारी, सांगली**

# मा. पंतप्रधान यांच्याकडून गौरव



"केंद्र सरकारने रेल्वेद्वारे लातूरला पाणी देण्याचा उपक्रम राबवला तो निश्चितच कौतुकास्पद आहे . सर्व जगभरातील प्रसारमाध्यमांसाठी ही एक मोठी बातमी होती . ज्या गतीने प्रशासनाने रेल्वेद्वारे लातूरला पाणी दिले, त्यासाठी ते प्रशंसेस पात्र आहेतच."

(दि. 14 एप्रिल 2016 रोजी 'मन की बात ' या दूरचित्रवाणी व आकाशवाणीवर प्रसारित झालेल्या कार्यक्रमातील)



पूर्ण क्षमतेच्या 25 लाख लिटर्स पाणी असलेल्या 50 टँकच्या व्हॅगनमधून लातूरला पाणी दिले जात आहे. लातूरमधील जनतेला दिलासा देण्यासाठी ही मोहीम सुरू राहणार आहे

**मा. ना. सुरेश प्रभू**
**रेल्वेमंत्री**



दुष्काळग्रस्त भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालयाने प्रयत्नांची शिकस्त केली आहे.

**मा. ना. देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र**



राज्याच्या एका जिल्ह्यात पाणीटंचाई असताना दुसरा जिल्हा मदतीला धावून गेला आहे. त्यामुळे लातूरला पाणी देण्याचे पुण्याचे काम सांगलीकरांनी केले आहे.

**मा. ना. चंद्रकांत पाटील**
**पालकमंत्री, सांगली**



या योजनेसाठी आवश्यक असलेली सर्व कामे वेळेवर जलद गतीने पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी तसेच महसूल प्रशासन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम केले, त्याचे आपल्याला कौतुक आहे.

**मा. ना. एकनाथ खडसे**
**मदत आणि पुनर्वसन मंत्री,**




लातूरची जनता तहानेने व्याकुळ असताना सांगली - मिरजच्या जनतेने रेल्वेव्दारे पाणी देण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला व सर्व यंत्रणेने युध्द पातळीवर काम करून लातूरला लवकरात लवकर 50 व्हॅगन्सव्दारे पाणी दिले. सांगलीकरांचे हृदय फार मोठे आहे. लातूरची पालकमंत्री म्हणून मी सांगलीच्या जनतेचे जाहीर आभार मानते.

**मा. ना. पंकजा मुंडे-पालवे**
**ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री लातूर**

## पाण्यासाठी दाही दिशा...

लातूर शहराची लोकसंख्या 5 लाख आहे . खाजगी बोअरवेलची संख्या अधिक.... सतत पाणी उपसा ... परिणाम बोअरवेल कोरड्या ठणठणीत... अशात निसर्गानेही पाठ फिरवली ... मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात 3 वर्षे पाण्याचा ठिपूस नाही ... **शेती आणि शिक्षणाच्या महानगरीत पाण्याची मात्र वानवा निर्माण झाली !** लातूरकरांची अवस्था म्हणजे पाण्यासाठी दाही दिशा, आम्हा फिरवशी जगदिशा ... अशी होऊन लातूरमध्ये पाणीबाणी निर्माण झाली ! मग सुरू झाला पाण्याच्या थेंबाथेंबासाठी संघर्ष!



## मा. मुख्यमंत्री पाहणी व बैठक



लातूरची पाणीबाणी... पाण्याविना निराश झालेले, वणवण भटकंती करणारी माय लेकरं... हर तऱ्हेने उपाय करण्यासाठी शासनाची धडपड ... आशेचा किरण दिसला... त्यातूनच पुढे आला रेल्वेद्वारे पाणी पोहोचवण्याचा पर्याय ... आधी पंढरपूरहून आणि अंतिमतः **३५० किलोमीटर दूर असलेल्या** मिरजहून...

## पहिली बैठक - मिरज



दिनांक : 5 एप्रिल 2016, स्थळ : शासकीय विश्रामगृह, मिरज... वेळ सकाळी 11 ची... खचाखच गर्दी... प्रशासनिक अधिकाऱ्यांची आणि माध्यम प्रतिनिधींची... नागरिकांसाठीही ऐकावं ते नवलच ! लातूरला पाणी द्यायचं आणि ते पण रेल्वेनं... काहीतरीच काय? कसं शक्य आहे? अशा प्रतिक्रिया... श्री. मकरंद देशपांडे यांनी मांडली संकल्पना आणि जिल्हा प्रशासनाने दिला हम होंगे कामयाबचा विश्वास ... चर्चा झडली, पाहणी झाली... ठरलं तर ठरलं... पाणी द्यायचं ते रेल्वेनं आणि मिरजेतूनच ... लागा कामाला.. असे मंत्रीमहोदयांचे आदेश... प्रशासनाचाही मनाशी निर्धार... है तय्यार हम!

# ४८ तासात कृती आराखडा



एकच ध्यास , लातूरला पाणी पाठवण्याची आस... गतीनं चाकं फिरली ... अवघ्या ४८ तासातच कृती आराखडा कागदावर उतरला व योजनेला तांत्रिक मंजुरी देण्यात आली. आवश्यक जलवाहिन्या, पंप, मनुष्यबळ यांची आखणी ... शासकीय मंजुऱ्यांसाठी पत्रप्रपंच... **लेकीच्या लग्नाला वधुपित्याला जशी छोट्या -छोट्या गोष्टींवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते , अगदी तसेच** जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता एम. एम. गरंडे, **कार्यकारी अभियंता सुरेश सादिगले, प्रल्हाद पांडे आणि त्यांचे सहकारी ,** ठेकेदार शशांक जाधव काम करत होते ... झोकून देऊन, तहानभूक हरपून...

## चरखुदाई कामास लगेचच प्रारंभ



ही गणितं मांडण्यात दोन दिवस **दोन** मिनिटांसारखे भुर्रकन उडाले . गुढीपाडव्याची पुरणपोळीची गोडी जिभेवर ठेवून कागदावर कृती आराखडा प्रत्यक्षात उतरवण्याची वेळ झाली. लगेचच दिनांक 9 एप्रिलला कामास प्रत्यक्ष प्रारंभ होऊन चरखुदाईच्या कामाचा नारळ फुटला...

## पन्नास टँकर्सच्या ट्रेनचे आगमन



पुणे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनीही रेल्वे ऐवजी रॉकेटच्या गतीने अस्तित्वात असलेल्या यंत्रणेची, यार्डातील व्हॅगन्स, नदीघाट, जलशुद्धीकरण केंद्र यांची पाहणी केली. दुसऱ्या दिवशी 9 एप्रिलला कोटा (राजस्थान) येथील रेल्वे वर्कशॉप येथे देखभाल, दुरूस्ती (मेनटेनन्स), टँकरची सफाई, रंगकाम, अंतर्गत स्वच्छता पूर्ण होऊन 50 टँकर्सची ट्रेन कोटा -मुंबई-पुणे मार्गे मिरजमध्ये दाखल झाली. नेहमी तेल वाहून नेणारे हे टँकर्स वाफेने स्वच्छ करण्यात आले. (स्टीम क्लीन्ड)

## चला चला रे पाणी भरूया..



चरखुदाईचे काम पूर्ण होण्यास आठवडा जाणार होता. दुसरीकडे 50 टँकर्सची ट्रेन येऊन थांबली होती . त्यामुळे रेल्वे प्रशासनाच्या पायांना आणि मनालाही भिंगरी, अशी अवस्था... एक फोन ठेवला की दुसरा... रेल्वे तर आली... आता पाणी भरायचे होते. जिल्हा प्रशासनाने प्लॅटफॉर्मवर काही टँकर्स भरता येतील का , अशी विचारणा रेल्वेला केली. रेल्वेने तत्परतेने रात्रीतून प्लॅटफॉर्मवर 10 टँकर्स भरले. ते देखील दोन पॅसेंजर किंवा एक्स्प्रेस ट्रेनच्या मध्यंतरात ... 10 एप्रिलला दुपारी 1 वाजता पुणे विभागीय रेल्वे मंडळाकडून 10 टँकर्स भरण्याचे आदेश प्राप्त झाले. दुपारी 2 ते रात्री 7 आणि पुन्हा रात्री 9 ते पहाटे 4 वाजेपर्यंत हे काम झाले.




## पहिली जलदूत रवाना

11 एप्रिल रोजी रेल्वे प्रशासनाच्या सहकार्याने अस्तित्वात असलेल्या यंत्रणेच्या माध्यमातून व रेल्वेचा पाणीपुरवठा विस्कळीत होऊ न देता 10 वॅगन्समधून 5 लाख लिटर्स पाणी घेऊन पहिली जलदूत रेल्वे सकाळी 11 वाजता लातूरकडे रवाना झाली. दुसऱ्या दिवशी ती पहाटे लातूरला पोहोचली.

## रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग...



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून सगळ्या औपचारिकता पणाला लावून जलवाहिनी टाकण्याचे काम युद्ध पातळीवर केले. सर्व ठिकाणच्या जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचा फडशा केवळ आठवडाभरात पाडला..



# ऐतिहासिक हैदरखान विहिरीची स्वच्छता!









**महानगरपालिका प्रशासनाकडून** ऐतिहासिक हैदरखान विहिरीतील झाडे-झुडपे काढून, कचरा काढून विक्रमी वेळेत स्वच्छता...

# दिस उगवला जीवनाची आशा घेऊन



लातूरकरांसाठी 12 एप्रिलची पहाट नवा दिवस , नवी आशा , जीवनाची नवी उमेद असा घेऊन आली . झुंजुमुंजु व्हायच्या वक्ताला जलदूतचे लातूरमध्ये आगमन झाले आणि एकच जल्लोष झाला . **फुले आणि पुष्पगुच्छ घेऊन एवढ्या पहाटे लातूरकर रेल्वेच्या स्वागताला आले .** शासनाने दिलेला शब्द पाळला आणि प्रशासनाने आपल्यासाठी रात्रीचा दिवस केला , याची मनोमन खात्री जनतेला पटली. सर्वसामान्य लातूरकरांनी मनापासून मिरजकरांना सलाम केला !

**जिल्हाधिकारी पांडुरंग पोले यांनी पाणी वाहतूक करणाऱ्या रेल्वेचे मुख्य चालक डी.पी. वाकडे, सहाय्यक चालक कमलेशकुमार सिंग , गार्ड प्रशांत जानराव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.**

## साथी हाथ बढाना...









# जलस्तंभ उभारणी...









दुसरीकडे रेल्वे सायडिंगजवळ पाणी भरण्याची व्यवस्था करण्यासाठी जलस्तंभांची उभारणी

# अखेर तो क्षण आला...




सांगली आणि लातूर प्रशासनाची यंत्रणा  15 दिवस राब-राब राबली. रात्रीचा दिवस केला. तहानभूक हरपून, अंग झाडून देऊन काम केले . आणि  19 एप्रिलच्या रात्री अखेर तो क्षण आला. 50 वाघिणींची ट्रेन रात्री  11 वाजता लातूरकडे रवाना झाली.

काम करणाऱ्या प्रत्येकाचा चेहरा थकलेला असला तरी त्या चेहऱ्यावर एक तेज होते समाधानाचे आणि श्रमसाफल्याचे, **कर्तव्यपूर्तीचे**...

# गौरव मोटरमनचा...



पाण्याचे रेल्वेचे सारथ्य मुख्य मोटारमन सुनिल खोत आणि सहाय्यक मोटारमन बी. जे. पोळेकर यांनी केले. त्यांचा सत्कार आमदार सुरेश खाडे आणि जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला.



# मंत्री महोदयांची लातूरला भेट आणि दिलासा



महसूल, मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे आणि पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी 5 एप्रिल रोजी लातूर शहराला भेट देवून रेल्वे स्थानक परिसराची पाहणी केली आणि पंधरा दिवसात पाणीपुरवठा सुरु करण्याची ग्वाही दिली.

## असाध्य ते साध्य करिता सायास!



जिल्हाधिकारी पांडुरंग पोले यांच्या नेतृत्वाखाली महसूल , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महापालिका, महावितरण आदि यंत्रणांमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र परिश्रम घेवून रेल्वेने येणारे पाणी उतरवून घेणे , त्याची जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत वाहतूक करणे आणि तेथून शहरात त्याचे वितरण करणे या बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांची उभारणी केली .

## अविरत परिश्रम!



जिल्हाधिकारी पांडुरंग पोले यांच्या मार्गदर्शनाखाली या यंत्रणांचे सुमारे 20 अधिकारी, 50 पेक्षा जास्त कर्मचारी आणि 200 मजुरांनी अविरत परिश्रम घेवून आवश्यक ती यंत्रणा उभारण्याचे काम केले.

## लातूर येथील विहिरीची व्यवस्था..



विहिरीची स्वच्छता आणि डागडुजी केल्यानंतर पाणी उतरवून विहीरीपर्यंत नेण्यासाठी सुमारे 850 मीटर लांबीची सिमेंटची जलवाहिनी बसविण्यात आली आहे.



**लातूरमध्ये 8 टँकर पॉईंटस्...**



विहिरीत साठविलेले पाणी टँकरमध्ये भरण्यासाठी 8 टँकर पॉईंट करण्यात आले असून , विहिरीवर 20 अश्वशक्ती क्षमतेच्या 12 मोटारी बसविण्यात आल्या आहेत . त्यांना वीज पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र फिडर देण्यात आले आहे . विहिरीपासून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी वाहून नेण्यासाठी सुमारे 3 किलोमीटर लांबीची जलवाहिनी अंथरण्यात आली आहे. विहीरीभोवती संरक्षक जाळी बसविण्यात आली आहे.

# लातूर - देशमुख यांची विहीर आली मदतीला...



रेल्वेने आणलेले पाणी रेल्वे स्थानकाजवळील एस. आर. देशमुख यांच्या शेतातील विहिरीत साठवले जाते . या विहिरीची पाणी साठविण्याची क्षमता सुमारे 22 लाख लिटर असून विहिरीची डागडुजी करण्यात आली आहे . विहिरीतील पाणी जलवाहिनीद्वारे ‘आर्वी’ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नेले जात असून तेथून त्याचे वितरण टँकरद्वारे केले जाते.



## पाणी वितरणाची व्यवस्था...



पाणी वितरणाच्या वेळी संबंधीत प्रभागातील रहिवाशांच्या प्रातिनिधीक स्वरुपात सह्याही घेतल्या जात आहेत . पाणी वितरणांवर महापालिकेचे तसेच राज्य शासनाचे अधिकारी -कर्मचारी लक्ष ठेवून आहेत . महापालिकेमार्फत पाणी वितरीत करण्यात येणाऱ्या टॅंकरवर 'जी.पी.एस.' यंत्रणा बसविण्यात आली आहे . दररोज वितरीत करण्यात आलेल्या आणि दुसऱ्या दिवशी करण्यात येणाऱ्या पाण्याची सविस्तर माहिती नागरिकांना महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

## स्वागत जलदूताचे...



जिल्हाधिकारी पांडुरंग पोले यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा आयुक्त सुधाकर तेलंग , महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता सतीश सुशीर आणि कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील, राज्य विद्युत मंडळाचे कार्यकारी अभियंता सुरेश फेरे यांच्या टीमने एक्सलंट वर्कडन केले.

श्री. पोले यांनी पाणी वाहतूक करणाऱ्या रेल्वेचे मुख्य चालक डी.पी. वाकडे, सहाय्यक चालक कमलेशकुमार सिंग, गार्ड प्रशांत जानराव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# मा. पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्याकडून पाहणी









**घटनाक्रम**

4 मार्च – दुष्काळी लातूर, बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांची पाहणी करण्याकरिता मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रीमंडळाचा दौरा. लातूरला प्रसंगी रेल्वेने पाणी देण्याची मा. मुख्यमंत्री यांची घोषणा

5 एप्रिल – मिरज येथे मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे आणि लातूरच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांची बैठक व रेल्वे स्थानकातील सुविधांची पाहणी. लातूर येथेही पाहणी.

48 तासात - कृती आराखडा

9 एप्रिल – मिरज येथे चरखुदाईस प्रारंभ. लातूर येथे रेल्वे व्हॅगन्स ते देशमुख विहीर ते टँकर्स पाणी उतरवणे व भरणे अशा व्यवस्थेच्या कामास प्रारंभ. लातूर येथे देशमुख विहिरीची स्वच्छता पूर्ण.

11 एप्रिल – मिरज येथून जलदूत 1 रवाना (सकाळी 11.11), क्रॉस कनेक्शन, रेल्वे क्रॉसिंग पहिला टप्पा काम पूर्ण. लातूर येथे रेल्वे व्हॅगन्स ते देशमुख विहीर ते टँकर्स पाणी उतरवणे व भरणे अशा व्यवस्थेचे काम विक्रमी 48 तासात पूर्ण

12 एप्रिल - शासनाची मंजुरी, हैदरखान विहिरीची स्वच्छता . लातूर येथे जलदूत 1 चे आगमन

13 एप्रिल – जलदूत 2 रवाना, जलस्तंभ उभारणी सुरू

14 एप्रिल – जलदूत 3 रवाना

15 एप्रिल - जलदूत 4 रवाना, क्रॉसिंग दुसरा टप्पा काम पूर्ण

16 एप्रिल - जलदूत 5 रवाना, रेल्वे यार्डातील पाणी भरण यंत्रणा, 25 जलस्तंभाचे काम पूर्ण

17 एप्रिल - जलदूत 6 (पहाटे 2)

17 एप्रिल - जलदूत 7 (रात्री 11)

18 एप्रिल - जलदूत 8 पीव्हीसी पाईपचे काम पूर्ण, पाणीवहनाची यशस्वी चाचणी

19 एप्रिल - जलदूत 9 व्हॅगन्समध्ये पाणीभरण

19 एप्रिल – 50 टॅँकर्सची पहिली जलदूत रवाना

**20 एप्रिल - लातूर येथे 50 टॅँकर्सच्या पहिल्या जलदूतचे आगमन**

**20 एप्रिलपासून 25 लाख लिटर्स पाणी घेऊन दररोज 50 टॅँकर्सच्या एक ट्रेनची फेरी**

## यंत्रणांचा परिपूर्ण समन्वय

**जिल्हा प्रशासन**

वेळोवेळी मार्गदर्शन, लातूर व सर्व यंत्रणांशी समन्वय, कामावर देखरेख, पाईपची जुळवाजुळव, एक्साईज ड्युटी प्रमाणपत्र

**रेल्वे प्रशासन**

ट्रेन, टँकर्स, ट्रॅक, साईडिंग, ट्रॅकवर पाणीभरण, जलवाहतूक,

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

तांत्रिक आराखडे, योजनेला मान्यता व अंमलबजावणी

**महानगरपालिका**

हैदरखान विहिरीची स्वच्छता, चरखुदाई कामास जेसीबी पुरवठा

**जिल्हा परिषद**

पंप उपलब्ध करून देणे

**महावितरण** - जॅकवेल येथे तातडीने नवीन वीजजोडणी, हैदरखान विहीर येखे नवीन वीजजोडणीसाठी रेल्वे प्रशासनाशी समन्वय , पाणी उपसा आणि जलभरण वेळी वीजपुरवठ्यात व्यत्यय येऊ न देण्यासाठी नियोजन

**जिल्हा माहिती कार्यालय** योजनेची प्रसिद्धी, विशेष लेख, जिल्हा प्रशासन आणि माध्यमांशी संपर्क व समन्वय,

## अंदाजपत्रक

1 कोटी, 85 लाख रुपये

## आवश्यक साधनसामग्री

| अंतर | व्यास | पाईपचा प्रकार | पाईपची संख्या |
|---|---|---|---|
| 2200 मीटर | 315 मिमी | पीव्हीसी 6 केजी | 370 |
| 350 मीटर | 300 मिमी | एमएस | 60 |
| 110 मीटर | 300 मिमी | डीआय के 9 | 20 |

जॅकवेल - 50 अश्वशक्ती क्षमतेचा व्ही. टी. (व्हर्टिकल टर्बाईल) पंप

हैदरखान विहीर - 25 अश्वशक्तीचे 3 सबमर्सिबल पंप

## टीम

80 मजूर

5 जेसीबी

2 जनरेटर

वेल्डींगची टीम

## मार्गदर्शन



मा. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री




मा.ना.चंद्रकांतदादा पाटील
पालकमंत्री,(सांगली)




श्री.संजय(काका)पाटील
खासदार सांगली लोकसभा



श्री.सुरेश(भाऊ)खाडे
आमदार,मिरज



श्री.धनंजय गाडगीळ
आमदार,सांगली



## संकल्पक

श्री.मकरंद देशपांडे
मिरज



## कुशल नेतृत्व

(श्री.शेखर गायकवाड) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, सांगली



(श्री.दिलीप पाटील)
प्रभारी मुख्यगकार्यकारी अधिकारी,
सांगली



(श्री. अजिज कारचे)
आयुक्त,
सां.मि.कु. महानगरपालिका



(श्रीमती संप्रदा बिडकर)
जिल्हारमाहिती अधिकारी,
सांगली



श्री. एस. एम. गरंडे
अधीक्षक अभियंता
म. जी. प्रा.



श्री.एस.जी.सादिगले
कार्यकारी अभियंता
म. जी. प्रा.



श्री. प्रल्हाद पांडे
कार्यकारी अभियंता(वि.)
म. जी. प्रा.



श्री. एस. ए. बारटक्के
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा, जि. प.



श्री.शशांक जाधव
ठेकेदार
सांगली



श्री. आर. एस. काळभोर
अतिरीक्त कार्यकारी अभियंता मिरज



ए. के. कांबळे
सहाय्यक अभियंता मिरज

# टीम वर्क



श्री. ए. के. तिवारी
वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक
पुणे



श्री. व्ही. रमेश
स्टेशन प्रबंधक
मिरज



श्री. विनोद कुलकर्णी
मुख्य यार्ड प्रबंधक
मिरज



श्री. बी. भगत
स्टेशन उपप्रबंधक
मिरज



श्री. पी. सी. कुलकर्णी
वरिष्ठ शाखा अभियंता
(विद्युत)



श्री. विजय शंकर पांडे
वरिष्ठ शाखा अभियंता
(कार्य)



श्री. पी. जे. हुल्याळकर
वरिष्ठ शाखा अभियंता
(रेलपथ निरीक्षक)



लक्ष्मण जाधव
सहाय्यक मंडल
यांत्रिक अभियंता



कृष्णात पाटील
मंडल परिचालन प्रबंधक

# प्रसारमाध्यमांकडून दखल


BBC NEWS

India 'water train' brings relief to drought affected state

11 April 2016 India


THE WALL STREET JOURNAL.

India Delivers Water by Train as Drought in West Intensifies

Maharashtra is in the grip of its second drought in as many years


Water train to leave by midnight


THE TIMES OF INDIA

Second water train from Miraj reaches Latur

द. टाईम्स ऑफ इंडिया दि. १२/४/२०१६


Train with 5L litres water leaves Miraj for Latur

Train with 5L litres water to reach Latur today

दै. लोकमत दि. २०/४/२०१६


अखेर 'जलदूत' पूर्णक्षमतेने रवाना


मिरजेतून चौथी 'जलदूत' लातूरकडे रवाना

दै. पुण्यनगरी दि. २०/४/२०१६


मिरजेतून ५० टँकरची रेल्वे लातूरकडे


पन्नास टँकरची रेल्वे लातूरला रवाना


'जलदूत' साठी खर्च ३० लाखांचा


लातूरकरांच्या 'जिवात जीव'

दै. पुढारी २०/४/२०१६



३० लाख लिटर पाणी लातूरकडे


दै. हिंदू दि. १२/४/२०१६


In Latur, a long wait for the water express

Latur sees hope in water wagons

# इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि सामाजिक माध्यमे









## सांगलीकर तुमचे आभार!

लातूरची तहान भागवण्या, सांगली आलं धावून
डोळ्यात आमच्या पाणी आलं, पाण्याची रेल्वे पाहून
तहानलेल्यांना पाणी देण्यास कोणी विरोध केला नाही...
एकही सांगलीकर कोर्टामध्ये गेला नाही...
खूप दूर असून सुध्दा मराठवाड्यासाठी धावून आलात
काळजात आमच्या कायमचे खूप खोल रुतून गेलात...
संकटकाळी धावून येणे, आम्ही कधी विसरणार नाही
तुमच्यावर संकट आल्यावर, मराठवाडा घरात बसणार नाही
सांगलीकडून सर्वांनी माणुसकी शिकली पाहिजे
हीच आपली संस्कृती आहे, सर्वांनीच ती जपली पाहिजे.
ऋणानुबंध काय आहेत, ईश्वरालाच माहीत...
सोनेरी अक्षरात लिहू, सांगली आमच्या वहीत...
राजकारणी, कर्मचारी सर्वांचे आभार,
पाणी पाजण्यासाठी ज्यांनी कष्ट घेतले फार...

**एक लातूरकर**

--0000000—